# अमरावती महानगरपालिका, अमरावती
## दिनांक ०६.१०.२०२२ रोजी प्राप्त प्रशासकीय विषय

**(प्रशासकीय विषय)**

**विषय क्रमांक ३५ :-** प्रभाग क्रमांक ०८ मधील व्यंकय्यापुरा येथे शिकस्त सार्वजनिक शौचालय तोडण्या बाबत

**ठराव क्रमांक ३५ :-** महानगरपालिका प्रभाग क्रमांक ०८ अंतर्गत व्यंकय्यापुरा येथे सार्वजनिक शौचालय आहे. सदर शौचालयाची स्थानिक नागरीक यांनी खुप जुनी व पडक्या स्वरुपात असून उपयोग नसल्यामुळे पाहणी करण्या बाबत कळविले होते. सदर शौचालयाची पाहणी केली असता सदर शौचालय जुने असुन सद्यस्थिती मध्ये कुठलेही नागरीक सदर शौचालयाचा वापर करत नाही. श्री. राजेश वानखडे, अध्यक्ष भिम बिग्रेड, महाराष्ट्र राज्य यांच्या विविध मागण्या संदर्भात दिनांक २२/०८/२०२२ रोजी झालेल्या बैठकीमध्ये दिलेल्या निर्देशानुसार सदरचे शिकस्त सार्व. शौचालय पाडुन त्या जागेवर वाचनालयाचे बांधकाम करण्याचे प्रस्तावित आहे.

शौचालय जिर्ण व पडक्या स्वरुपात असून शिकस्त, असल्याने शौचालय पाडण्याच्या प्रस्तावास मा. आयुक्त यांची मंजुरी प्राप्त आहे. सदर प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस सादर करण्यात आला आहे. परंतु, सद्यस्थितीत सर्वसाधारण सभा अस्तित्वात नसल्याने सर्व सभेचे अधिकार प्रशासक यांना असल्याने सदर प्रशासकीय विषयास मंजुरी प्रदान करण्यात येत आहे.

ठराव मंजुर व कायम

**स्वा/-**
**नगरसचिव,**
**महानगरपालिका,अमरावती**

**स्वा/-**
**प्रशासक,**
**महानगरपालिका,अमरावती**

नगरसचिव
महानगरपालिका, अमरावती